ection Letter

# उपनिबंधक,सहकारी संस्था,धुळे तालुका धुळे यांचे कार्यालय
## प्रशासकीय संकुल,जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार,धुळे-४२४००१

जा.क्र.वि-२/ निवडणूक/शिरुड विका/कलम ७७अ/प्राधिअधि/सन २०१७ दिनांक २२ डिसेंबर,२०१७

वाचिले- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (सुधारणा २०१३) चे कलम ७७ अ (१-अ)(ब)
२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७३ आय
३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील तरतुद
४. मा.राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडील आदेश जा.क्र.५५०/रासनिप्रा तालुकाप्रभाग/आदेश/सन २०१४ दिनांक १०/१०/२०१४

ज्याअर्थी, शिरुड विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या शिरुड ता.जि,धुळे ही संस्था या कार्यालयाने नोंदणी केलेली नोंदणीकृत सहकारी संस्था असुन सदर संस्था असुन या कार्यालयाच्या कार्यक्षेत येते ( यापुढे संस्था असा नामोलिखीत)

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे ७३ क ब (१०) विद्यमान समितीची मुदत संपण्यापुर्वी निवडणुक घेण्यात येईल असी तरतुद आहे.

ज्याअर्थी, कलम ७३ आय अन्वये समितीची मुदत संपणेपूर्वी कलम ७३ क ब च्या पोटकलम (१४) अन्वये तरतुद केला प्रमाणे निवडणुक घेणेसाठी मा. राज्यसहकारी निवडणुक प्राधिकरणास कळविणे हे समितीचे कर्तव्य असेल त्यात संस्थेने अनुपालन करण्यास करुन केलेला आहे.

ज्याअर्थी, शिरुड विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या शिरुड ता.जि.धुळे या समितीचा कालवधी दिनांक ०८/१०/२०१६ रोजी संपलेला आहे.

ज्याअर्थी,महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम (समितीची निवडणुक) नियम २०१४ मध्ये नियम ९(३) समितीची संपण्यापुर्वी १२० दिवस आगोदर निवडणुकीची यादी संबंधीत निबंधकाकडे सादर करण्याची तरतुद आहे.

ज्याअर्थी, उक्त संस्थेने समितीचा कालावधी दिनांक ०८/१०/२०१६ रोजी संपुष्टात येऊन ही निवडणुकची माहिती विहित मुदतीत देण्यास तसेच त्यासंबंधीचे कागदपत्र देण्यास कसुर केलेला आहे,

ज्याअर्थी , निवडणुक घेणेकामी संस्थेस मतदार यादी सादर करणे बाबत व प्राधिकरणाच्या खाती निवडणुक निधी जमा करणे बाबत संस्थेस लेखी स्वरुपात कळविलेले असून संस्थेचे सचिव यांना वेळोवेळी मासिक सुचना देण्यात आलेले आहेत.

--२--

तथापी, सदरची बाब दूरलक्षीत करुन संस्थेने मतदार यादी सादर करणे व निधी भरण्यास देखील कसुर आहे.अशी माझी खात्री झाल्याने मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

मी किशन रत्नाळे, उपनिबंधक,सहकारी संस्था,धुळे तालुका धुळे मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ नुसार प्राप्त झालेल्या विधी शक्ती नुसार शिरुड विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म.शिरुड ता.जि.धुळे या संस्थेवर श्री जी.जी.पवार, बँक तपासणीस, धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.धुळे शाखा शिरुड ता.जि.धुळे यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात येत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक २२/ १२/२०१७ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी पारीत करीत आहे.

(किशन रत्नाळे)
उपनिबंधक,
सहकारी संस्था,धुळे तालुका धुळे

दिनांक - २२/१२/२०१७
ठिकाण - धुळे

प्रति.

१. श्री जी.जी.पवार,बँक तपासणीस,धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.धुळे शाखा शिरुड ता.जि. धुळे

२/- यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी संस्थेचा दप्तरी पदभार घेऊन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील तरतुदी नुसार कामकाज करुन वेळोवेळी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२.चेअरमन /सचिव, शिरुड विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था म. शिरुड ता.जि.धुळे

२/- यांना सुचित करण्यात येते की, आपण उक्त आदेशांची अंमलबजावणी करुन प्राधिकृत अधिकारी यांना दप्तराचा पदभार देण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

**प्रत - माहितीसाठी सविनय सादर**

१.मा.सचिव,महाराष्ट्र सहकारी निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य, पुणे
२.मा.जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,धुळे
३.मा.मुख्यकार्यकारी अधिकारी,धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.धुळे याना माहितीसाठी सस्नेह
४.कार्यालयीन शाखा विकास -२ माहितीसाठी

उपनिबंधक,
सहकारी संस्था,धुळे तालुका धुळे